दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
• वर्ष १६ वे • अंक ११४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.१८ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

पनवेलमध्ये वारकऱ्यांनी केला सरकारचा निषेध

पनवेल तहसीलदार यांच्याकडे वारकऱ्यांनी दिले निवेदन

दै.रायगड नगरी । पनवेल

विश्व हिंदू परिषद आणि वारकरी संप्रदाय पनवेल प्रखंड यांनी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांना आज (शनिवार दि.१७ जुलै) एक निवेदन देण्यात आले. आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी महाराष्ट्रातून लाखो वारकरी पायी पंढरपुराला जात असतात. मात्र गेल्या वर्षापासून कोरोनामुळे सर्वांनीच समजुतदारपणे पायी वारीचे आयोजन केले नाही. मात्र यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात जाणवत असल्याने सर्व नियम पाळून वारकऱ्यांनी पायी वारी करण्याचा निर्णय घेतला आहे. तरीदेखील हिंदुधर्म विरोधक सरकारने यावर्षी पायीवारीवर पुन्हा बंदी घातली. आणि एवढेच नव्हे तर जेष्ठ कीर्तनकार ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांनाही अटक केली. अशा प्रकारे वारकऱ्यांची प्रत्येक ठिकाणी अडवणूक केली जात आहे. असे वारकऱ्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

संविधानाने नागरिकांना दिलेला उपासना करण्याचा अधिकार आणि मुलभूत स्वातंत्र यांना कोणी अडवू शकत नाही असे म्हणत अनेक वारकऱ्यांनी सरकारच्या धोरणाचा निषेध नोंदवला. या धोरणांविरुद्ध विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि वारकरी सांप्रदाय यांच्या वतीने पनवेल तहसीलदार कार्यालयाबाहेर सरकारचा निषेध करण्यात आला. तहसीलदार कार्यालय पनवेल येथे नायब तहसीलदार संजीव मांडे यांच्याकडे निवेदन देताना अखिल भारतीय वारकरी मंडळ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धनाजी महाराज पाटील, पुंडलिक महाराज फडके, विश्व हिंदू परिषद बजरंग दल प्रखंड संयोजक सुभाष कडव, विठ्ठल रुक्मिणी पायी कोकण दिंडी चालक सुरेश महाराज पाटील, श्री.संत चांगा वटेश्वर पालखी सोहळ्याचे संचालक वसंत महाराज दुर्गे, विश्व हिंदू परिषद बजरंग दल पनवेलचे संजय उलवेकर, गुरुनाथ मुंबईकर यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

मागच्या वर्षी कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता वारीसंदर्भात कोणीही वारकऱ्यांनी उठाव केला नाही. सरकारने दिलेल्या सूचनेनुसार व विविध निर्बंधांनुसार पालन करण्यात आले होते. परंतु यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला असून एका दिंडी मागे किमान दहा वारकऱ्यांना चालण्याची सरकारने परवानगी दिल्यास वारकऱ्यांना आनंद झाला असता. परंतु वारीला परवानगी न देता सरकार राबवित असलेल्या धोरणांमुळे अतिव दुःख होत आहे. त्यामुळे यापुढे कार्यक्रमांचे आयोजन करताना बंधने चालतील परंतु बंद नको; असे यावेळी वारकऱ्यांनी बोलताना सांगितले.

वारीदरम्यान कमी लोकांमध्ये कीर्तन, भजन करू, सोशल डिस्टनसिंग पाळू, मास्क लावू अशाप्रकारे सर्व निर्बंधांचे पालन करू परंतु सरकारने वारी करण्यावर बंदी घालू नये अशी मागणी समस्त वारकरी आणि विश्व हिंदू परिषद बजरंग दल यांच्या वतीने करण्यात आली.

> गेली साडे सातशे वर्षे संत महात्म्यांपासून सुरू असलेल्या पंढरपूरच्या वारीला खंडित करण्याचा सरकारने प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर आमच्या संप्रदायाची वेशभूषाही उतरवली. ब्रिटिश आणि मुघल शासनाने जे कृत्य केले नाही ते महाराष्ट्र सरकारच्या काळात झाल्याने दिंडी स्वरूपात निषेध मोर्चा काढून पनवेल तहसीलदारांना याबाबत निवेदन देण्यात आले. सद्यस्थितीत लग्न समारंभ, सामाजिक कार्यक्रम, सरकारी कार्यालये, अंत्ययात्रा आदींना विविध निर्बंध आखून परवानगी दिली जाते तर मग सरकार वारी का खंडित करीत आहे.? आम्ही देखील सर्व सूचना आणि निर्बंधांचे पालन करू. परंतु सरकार परवानगी न देता वारकऱ्यांची परंपरा खंडित करीत असल्याने सरकारच्या या धोरणाचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे.
>
> **- सुभाष कडव (विश्व हिंदू परिषद बजरंग दल प्रखंड संयोजक)**

शॉर्ट सर्किटने कळंबोलीतील शेकडो विद्युत उपकरणे जळून निकामी, लाखोंचे नुकसान

दै.रायगड नगरी । कळंबोली

कळंबोलीतील अ, ब, क आणि ड आ-वार, एल.आय.जी.२, सेक्टर१ मधील बैठ्या घरांमधील विद्युत प्रवाह अचानक पणे वाढल्याने शेकडो घरातील विद्युत उपकरणे अचानक लाईट चा स्पोर्ट होऊन कोणाचे फ्रिज, टीव्ही, आणि इतर उपकरणे जळून निकामी झाली आहेत. त्यामुळे कोरोना काळात नागरिकांना वेगळ्याच आर्थिक संकटाला व समस्येला सामोरे जावे लागले आहे. विद्युत प्रवाह इतका प्रचंड दाबाने होता की टीव्ही, फ्रीज, पंखे, मोबाईल, मोबाईल चार्जर, संगणक, केबल बॉक्स व अन्य विद्युत उपकरणे पूर्णतः निकामी झाल्याने मोठे आर्थिक नुकसान येथील रहिवाशांना सहन करावे लागल आहे. याबाबत कळंबोलीचे विद्युत अभियंता गोकुळ सोनवणे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की जमिनी खाली असणारी मोठी विद्युत लाईन शॉर्टसर्किट मध्ये पाणी शिरल्याने सदर चा अपघात होऊन विद्युत उपकरणांची हानी झाल्याचे सांगण्यात आले आहे.

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर १ मधील एलआयजी म्हणजे बैठ्या घरांच्या वसाहत आहेत. या वसाहतीमध्ये चार विभाग आहेत. या विभागांमधून विद्युत पुरवठा करणारी वीज वितरण कंपनीची अकरा केवी ची मोठी विद्युत वाहिनी आहे .या भागात प्रत्येक विभागात ९६ घरांची वस्ती आहे. आज दुपारी साडेतीन वाजता जमिनीखाली असणार्याठ या मोठ्या विद्युत वाहिनी मध्ये निचरा होणारे पाणी शिरल्याने मोठा स्फोट झाला. विद्युत प्रवाह इतक्या प्रचंड वेगाने होता की घरातील विद्युत वाहिन्यांमधून विजेचा प्रवाह मोठा वाढल्याने घरातील विद्युत साधनांचा स्फोट झाला. स्फोट इतका मोठा होता की सि-२, सेक्टर १, एल.आय.जी २ च्या घरातील टेबलावर असलेला टीव्ही खाली पडला. विद्युत वाहिनी मधील असणारा विद्युत प्रवाहाचा दाब प्रचंड वेगाने वाढला व तो या घरांमधील सुरू असलेल्या विद्युत उपकरणांमध्ये जाऊन या बैठ्या घरांतील शेकडो सुरू असलेली .../२

राज्यपालांनी हेवेदावे विसरुन १२ सदस्यांची नेमणूक करावी : राज्य सरकार

दै.रायगड नगरी । मुंबई

विधानपरिषदेच्या नामनियुक्त सदस्यपदांसाठी १२ जणांची नावं राज्य सरकारकडून राज्यपालांना पाठवून आठ महिने उलटले, तरीही राज्यपालांनी त्यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे राज्यपालांनी राजकारणातील हेवेदावे विसरून लोकशाहीच्या हिताच्या दृष्टीने या नामनियुक्त सदस्यांची नेमणूक करावी, असं राज्य सरकारच्यावतीनं मुंबई उच्च न्यायालयात बाजू मांडताना सांगण्यात आलं आहे.

राज्यपाल नियुक्त १२ सदस्यांच्या जागा अजूनही रिक्त आहेत. राज्य मंत्रिमंडळाने ६ नोव्हेंबर २०२० रोजी या १२ नावांची शिफारस राज्यपालांकडे केलेली आहे. मंत्रिमंडळात या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आल्यानंतर ही नावं राज्यपालांकडे पाठवण्यात आली. मात्र, यावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. यावरून सत्ताधारी आघाडीतील नेते व मंत्र्यांकडून सातत्याने अनेक टीकात्मक विधानेही केली गेली आहेत. त्यातच नामनियुक्त सदस्यांबाबत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे निर्णय घेत नसल्याने नाशिक येथील रतन सोली यांनी हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर व्हिसीमार्फत सुनावणी सुरू आहे. .../२

संक्षिप्त...

भर पावसात मालाडमध्ये घरे तोडली

दै.रायगड नगरी । मुंबई

कुरार मेट्रोमध्ये बाधित होणाऱ्या मालाड पूर्वेकडील रहिवाश्यांच्या घरांवर तुघलकी कारवाई करत एमएमआरडीएने पोलिस बळाचा वापर करत भर पावसात बुलडोजर फिरवला. विरोध करणाऱ्या रहिवाशांना पोलिसांनी अमानुषपणे मारहाण केली असा आरोप मुंबई भाजपा प्रभारी व कांदिवली पूर्व विधानसभा मतदार संघाचे आमदार अतुल भातखळकर यांनी केला. यावेळी आमदार भातखळकर यांना अटक करण्यात आली.

मराठी माणसाच्या नाव-ावर पक्षाचे दुकान चालवणाऱ्यांनी मराठी माणसालाच उद्ध्वस्त केले आहे. कुरार मेट्रो स्टेशनचे नोव्हेंबरमध्ये उद्घाटन करण्याचा घाट ठाकरे सरकारने घातला आहे. मुख्यमंत्र्यांना उद्घाटनाची घाई झालेली असल्यामुळे 'कोणत्याही परीस्थितीत ही वस्ती हटवा', असे आदेश एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले होते असा आरोप त्यांनी केला.

गिरगाव पॅटर्ननुसार आहे त्या ठिकाणी घरांचे पुनर्वसन करावे या मागणीसाठी आमदार अतुल भातखळकर यांच्या नेतृत्वाखाली रहिवाशांनी इथे आंदोलनही केले. परंतु ठाकरे सरकारने या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. गोरेगाव पश्चिमेतील एका इमारतीत स्थलांतरीत होण्यासाठी एमएमआडीएचा दबाव सुरू होता. या इमारतीत अलिकडेच स्लॅबपडून एकाचा मृत्यू झाला असल्याने इथे जाण्यास रहिवाशांचा विरोध होता. पाचव्या मजल्यावर जागा दिल्यामुळे दुकानदारही संतप्त होते. रहिवाशी ऐकत नसल्याचे बघून ठाकरे सरकारने दहशतीचा बडगा उगारला.

जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून कंत्राटी कामगारांसाठी ऐतिहासिक पगारवाढ

दै.रायगड नगरी । पनवेल

जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये असेल्या डाऊ केमिकल्स इंटरनॅशनल प्रा. लिमिटेड कंपनीमधील कंत्राटी भरघोस वेतनवाढीचा करार आज (दि. १७) येथे पार पडला. जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर, संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा करार विशेष म्हणजे कंत्राटी कामगारांच्या दृष्टिकोनातून कामगार विश्वातील एक ऐतिहासिक करार आहे.

या करारनाम्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, डाऊ केमिकलचे एच आर मॅनेजर योगेश कुत्तडकर, .../२

> जय भारतीय जनरल कामगार संघटना सातत्याने कामगारांच्या हितासाठी धडपडत असते. अनेकदा कंपनी आणि कामगार यांच्यात संघर्ष होतो, त्यामुळे दोघांमध्ये समन्वय राहत नाही, त्या कारणाने व्यवस्थापन कामगारांकडे दुर्लक्ष करते. मात्र जितेंद्र घरत आणि त्यांच्या टीमने सातत्याने याकडे प्रकर्षाने लक्ष दिले आहे. कामगार आणि कंपनी यांची प्रगती झाली पाहिजे हा एकमेव उद्दिष्ट घेऊन ते सतत काम करीत आहेत.
>
> **- आमदार प्रशांत ठाकूर**

राज्यात नवीन कारागृह उभारण्याबाबत शासन निर्णय घेणार : गृहमंत्री दिलीप वळसे पाटील

पिंपरी : वृत्तसंस्था

राज्यात आणखी कारागृह उभारण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत शासन निर्णय घेणार आहे. तसेच राज्यात ५२०० पोलीस शिपाई पदांची भरती काढण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात आणखी सात हजार पदे भरण्यात येणार आहेत, अशी माहिती राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

वळसे पाटील यांनी शनिवारी दुपारी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला भेट देत आढावा बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. पोलीस महासंचालक संजय पांडेय, आयुक्त कृष्ण प्रकाश, अपर आयुक्त रामनाथ पोकळे उपस्थित होते. वळसे पाटील म्हणाले, कोरोना परिस्थितीनुसार कैद्यांसाठी कारागृहात उपाययोजना केल्या आहेत. त्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार काही जणांना तुरुंगातून सोडण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात काही नवीन जेलची निर्मिती करण्याची आवश्यकता आहे. त्याबाबतची मागणी आज झाली. त्यासंदर्भात शासन निर्णय घेईल.

त्या दहा भाजपवासी नगरसेवकांची उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

दै.रायगड नगरी । माथेरान

नगरपरिषदेत शिवसेनेची सत्ता स्थापन असताना पक्षातील काही मतभेदांमुळे साडेचार वर्षानंतर एकूण दहा नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केल्यामुळे शिवसेनेला काहीशा प्रमाणात निश्चितच फरक पडला आहे.

माथेरान नागरपालिका जेमतेम ३५०० मतदार संख्या असलेली एक लहान पालिका आहे तरीही येथे सतरा नगरसेवक आहेत व प्रत्येक निवडणुकीमध्ये येथे सत्तांतर घडतेच त्यामुळे निवडणुकीपूर्वी येथील राजकीय पक्ष नेहमीच सक्रिय झालेले पहावयास मिळतात मागील काही वर्षांमध्ये राष्ट्रवादी व शिवसेनेचे आघाडी व युतीच्या मार्फत अनेक वर्षे सत्ता उपभोगली होती पण मागील निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीला खिंडार पडून अनेक जण शिवसेनेमध्ये जाऊन स्वबळावर सत्ता स्थापन केली होती व ह्या काळात माथेरानमध्ये अनेक विकास कामे झाली होती व त्याद्वारे शिवसेना पुन्हा स्थापन करणार असे चित्र दिसत असताना पुन्हा एकदा फोडाफोडीचे राजकारण झाले व शिवसेनेचे तब्बल दहा नगरसेवक व पदाधिकारी भाजपमय झाले व शिवसेनेला ब्रेक लागण्याचे काम झाले ह्या एका घटनेने माथेरानचे राजकारण बदलले व आगामी निवडणुकीमध्ये

सर्वांना समान संधी उपलब्ध झाल्याने सर्वच राजकीय पक्ष पुन्हा जोमाने सक्रिय झाल्याचे पहावयास मिळत आहे त्यामुळे निवडणुकीची पहिली पायरी म्हणजे पक्षप्रवेशाने सुरवात झाली आहे. माथेरानच्या पालिका निवडणूकी मध्ये भाजपा ची ताकद नगण्य होती पण त्यांच्या सहकार्यामुळे अनेकांना पालिकेमधे प्रवेश मिळाला आहे मागील काही दिवसांच्या घडामोडीने भाजपा ला उर्जित अवस्था प्राप्त झाली असून तब्बल नऊ नगरसेवक त्यांच्या बरोबर असल्याने एक मोठी फळी त्यांच्याकडे उपलब्ध झाल्याने त्यांनीही निवडणुकीची तयारी सुरू केली असून पक्ष प्रवेशास सुरवात केली आहे पण शिवसेनेने त्यांना लगाम घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे पक्षविरोधी कायद्याअंतर्गत नगरसेवक पद रद्द करण्याची याचिका दाखल केली आहे. माथेरान नगरपरिषदेच्या सत्ताधारी शिवसेना पक्षातून भारतीय जनता पक्षात पक्षांतर केलेल्या दहा नगरसेवकांना आज मुंबई उच्च न्यायालयात एका रिट याचिकेत अपयशाला सामोरे जावे लागले. दिनांक २७ मे २०२१ रोजी, शिवसेनेतर्फे निवडणूक लढवून विजयी झालेले ९ नगरसेवक आणि सत्ताधारी शिवसेना पक्षाने स्विकृत सदस्य म्हणून नियुक्त केलेले चंद्रकांत धोंडू जाधव हे दहावे नगरसेवक अश्यांनी शिवसेना पक्षातून भाजप मध्ये प्रवेश केला. तद्रंतर दिनांक ३ जून २०२१ रोजी त्यांनी त्यांच्या पक्षांतराबाबत पत्रकार परिषद भरवून आपली बाजू मांडली होती. दहा नगरसेवकांच्या पक्षांतरा नंतर दिनांक २१ जून २०२१ रोजी प्रभारी जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरविकास विभाग, रायगड यांनी सर्व दहा नगरसेवकांना महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ अन्वये नोटीस बजावली होती. सदर नोटीशीस पक्षांतर केलेल्या दहा नगरसेवकांनी रिट याचिके द्वारे उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. महाराष्ट्र शासन, मा जिल्हाधिकारी, गटनेते प्रसाद सावंत, सचिव अनिल देसाई, माथेरान मुख्याधिकारी यांना त्यांनी याचिकेत प्रतिवादी केले होते, २१ जून २०२१ ची सुनावणी नोटीस नियमाला अनुसरून दिली नाही तसेच राजकीय दबावाखाली सुनावणी लावण्यात आली असे याचिकेत नमूद करून मा उच्च न्यायालयाची दिशाभूल करण्याचा आणि वेळकाढू पणासाठी प्रयत्न करण्यात आला, सदर याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती शाहरुख काथावाला आणि न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या खंडपीठापुढे होऊन बंडखोरी केलेल्या दहा नगरसेवकांची याचिका फेटाळण्यात येऊन त्यांच्यावर न्यायालयाने फटकारे ओढले.

याप्रकरणी नगरपरिषदेतील शिवसेनेचे गटनेते प्रसाद विश्वनाथ सावंत यांनी उत्तरादाखलच्या प्रतिज्ञापत्रात दहा बंडखोर नगरसेवकांनी केलेला बनाव न्यायालयाच्या निदर्शनास आणला. या रिट याचिकेत शिवसेनेचे गटनेते प्रसाद वि. सावंत यांचेतर्फे प्रदिप म. पाटील, रेवती अवधूत तटकरे व प्रवीण ब. गोळे यांनी वकीलपत्र पाहिले. आजच्या ह्या निकालानंतर माथेरानमध्ये राजकीय वातावरण तापले असून फोडाफोडीच्या राजकारणाला आता अधिक उधाण येणार आहे मागील काही दिवसांमध्ये झालेले पक्ष प्रवेश हे येथील चर्चेचे विषय ठरले होते एकाच व्यक्तींचे दोन दोन राजकीय पक्षात प्रवेश झाल्याने पक्षप्र-वेश वरून येथील राजकारण कोणत्या थराला गेले आहे ह्याचीच चर्चा सर्वत्र केली जात आहे.

राजद्रोहाचा कलंक

इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याची ३० जानेवारी १६४९ रोजी हत्या झाली आणि क्रॉमवेलने सत्ता हाती घेतली. ११ वर्षांनी क्रॉमवेल मरण पावल्यानंतर, वडिलांच्या हत्येनंतर परागंदा झालेला दुसरा चार्ल्स लंडनला परतला आणि १६६०मध्ये राज्यावर बसला. त्यानंतर एकाच वर्षाने, म्हणजे १६६१ मध्ये ब्रिटिश संसदेने अत्यंत कठोर असा 'राजद्रोहा'चा कायदा मंजूर केला. प्रत्यक्ष बंड तर सोडाच, बंडाची भाषा हाही राजद्रोह समजून कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली. पुढे भारतात १८५८मध्ये ईस्ट इंडिया कंपनीकडून कारभार राणीकडे आल्यानंतर, ब्रिटिश राजद्रोह कायद्याच्या धर्तीवर १८७०मध्ये राजद्रोहाचा कायदा भारतात लागू करण्यात आला. काही बदल, दुरुस्त्या झाल्या असल्या, तरी मूळ आत्मा न हरवलेले राजद्रोहाचे कलम भारतीय दंडविधानात आजही आहे. खिळखिळ्या झालेल्या युनायटेड किंग्डममध्ये मात्र १९७५ नंतर या कायद्याखाली नवे गुन्हे नोंदविण्यात आलेले नाहीत. राजद्रोहाचा कायदा कालबाह्य झाल्याची तक्रार करणाऱ्या याचिका देशभर वारंवार आल्या आहेत. सध्या सर्वोच्च न्यायालयात अशा अनेक याचिका आहेत. त्यातली एक निवृत्त लष्करी अधिकाऱ्याची, दुसरी अरुण शौरींची, तिसरी पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीजची; तसेच 'एडिटर्स गील्ड ऑफ इंडिया'चीही आहे. या याचिका एकत्र करताना सरन्यायाधीश एन. व्ही. रमण यांनी जे निरीक्षण मांडले, त्यावरून सर्वोच्च न्यायालयाचा कल लक्षात येतो. तो पाहता 'पीनल कोड'मधील हे कलम सर्वोच्च न्यायालयाने घटनेतील मूलभूत अधिकारांशी विसंगत ठरवले, तर आश्चर्य वाटायला नको. जशी ब्रिटनमध्ये राजाच्या हत्येनंतर गंभीर स्थिती आली; तशीच स्थिती १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धाने भारतात आली. तशी पुन्हा येऊ नये, यासाठी साम्राज्यवादी ब्रिटिशांना कोणतेही बंड चिरडून टाकणे आवश्यक होते. त्या मानसिकतेचा इतिहास सांगणारे राजद्रोहाचे कलम ठेवायचे का, हा यातला खरा प्रश्न आहे. सरन्यायाधीशांनी केंद्र सरकारला यासंबंधी विचारलेले प्रश्न योग्य आहेत. राजद्रोह आणि देशद्रोह या दोन स्वतंत्र संकल्पना आहेत. त्यांची बेमालूम सरमिसळ करणे सोपे असते; त्यामुळेच आजवर विश्व हिंदू परिषदेचे माजी सरचिटणीस डॉ. प्रवीण तोगडिया, लेखिका अरुंधती रॉय, सिमरनजितसिंग मान, व्यंगचित्रकार असीम त्रिवेदी, पर्यावरण कार्यकर्त्या दिशा रवी यांच्यासहित अनेकांवर राजद्रोहाचे कलम लावण्यात आले. २०१४ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर दंड विधानातील १२४-अ या राजद्रोहाच्या कलमाखाली ५५९ जणांना अटक करण्यात आली. आजवर त्यातले फक्त दहाजण या कलमाखाली दोषी ठरले. यंदा तीन जूनला पत्रकार विनोद दुआ यांच्यावर या कलमाखाली हिमाचल प्रदेश पोलिसांनी केलेली कारवाई सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविली होती. स्वातंत्र्यानंतर सर्वच सरकारांनी या कलमाचा, राजकीय विरोधकांना दहशतीखाली ठेवण्यासाठी सढळ हाताने वापर केला आहे. केंद्र; तसेच राज्य सरकारांचा हा दृष्टिकोन लक्षात घेऊन, पोलिस 'राजापेक्षा राजनिष्ठ' होत छोट्या छोट्या गुन्ह्यांसाठी हे कलम लावू लागले. सरन्यायाधीशांच्या उद्विग्न प्रश्नांमागचे ते एक कारण आहे. सत्तारूढ पक्ष किंवा सत्ताधाऱ्यांच्या विरोधात केलेले कायद्यांच्या चौकटीतील कोणतेही आंदोलन हा राजद्रोह नसतो आणि देशद्रोह तर नसतोच नसतो; मात्र देशातील सगळे आंदोलक हे जणू देशद्रोह, म्हणजे 'ट्रेजन' आणि राजद्रोह म्हणजे 'सिडिशन' करीत आहेत, असा आभास निर्माण केला जातो. राजद्रोह म्हणजे सारी सत्ताव्यवस्थाच उलथवून लावण्यासाठी प्रयत्न करावयाचे आणि देशद्रोह म्हणजे राष्ट्र या संकल्पनेशीच विविध मार्गांनी वैर करून युद्ध छेडायचे. जम्मू-काश्मिरातले दहशतवादी, माओवादी, खलिस्तानी, ईशान्य भारतातल्या प्रभाव कमी झालेल्या दहशतवादी संघटना हे सगळे यात येतात. या सगळ्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी भारतातील फौजदारी कायदे क्रमाक्रमाने कठोर होत गेले. याशिवाय, अशांत टापू लष्कराच्या ताब्यात देण्याचा अखेरचा पर्याय असतोच. सन १९८५मधील 'टाडा'पासून सुरू झालेला हा प्रवास सर्वांना परिचित आहे. सरकारच्या रागातून रस्त्यावर उतरणारे निदर्शक किंवा हातात शस्त्र न घेता केवळ आगखाऊ भाषणे करणारे आंदोलक राजद्रोही किंवा देशद्रोही नसतात. त्यांना तसे वागवणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूल्याशी विसंगत ठरते. टीका करणाऱ्या पत्रकारांना हे १२४-अ कलम लावणे हा एकतर दुष्टपणा किंवा सूड उगविण्याचा रानटीपणा असतो. कितीही कठोर टीका करणारा पत्रकार किंवा संपादक सशस्त्र संघटना बांधून सत्ता उलथवून टाकण्याच्या कटातला गुन्हेगार नसतो; मात्र तसे त्यांना वागवले जाते. यातून देशप्रेम किंवा राजनिष्ठा या संकल्पना कमालीच्या पातळ किंवा सवंग होतात. याशिवाय, सत्ताधाऱ्यांशी मतभेद म्हणजे राजद्रोह, हे चुकीचे समीकरण तयार होते. सर्वोच्च न्यायालयाने ज्या गांभीर्याने या मुद्द्याला हात घातला आहे; ते पाहता भारतीय लोकशाहीवरचा हा कलंक लवकरच दूर होईल, अशी आशा दिसते आहे.

शेती आणि पुरक व्यवसायाला चालना मिळावी : खा.सुनिल तटकरे

दै.रायगड नगरी । म्हसळा

राज्य आणि केंद्र यांच्या तर्फे देण्यात येणारा शेतीनिष्ठ पुरस्कार जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळेल याबत प्रयत्न करावा. आज पुरस्कार मिळालेल्या शेतकऱ्यांना पुढील वर्षी राज्यस्तरावरील आणि केंद्र स्तरावरील पुरस्कार मिळण्यासाठी लागणारी सर्व मदत मी निश्चितपणे करीन असे आश्वासन खा.तटकरे यांनी रायगड जिल्हा प्रेस क्लब व संयुक्त म्हसळा तालुका प्रेस क्लबच्या वतीने आयोजित शेतकऱ्यांना शेताचे बांधावर जावून सन्मानित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी केले.

रायगड जिल्हा प्रेस क्लब, संयुक्त म्हसळा तालुका प्रेस क्लबच्या वतीने दरवर्षी तालुक्यातील दोन प्रगतशील शेतकऱ्यांना त्यांचे शेताचे बांधावर जाऊन सन्मानित करण्यात येतो त्यानुसार या वर्षी पाष्टी येथील जीवन गोविंद लाड आणि कणघर येथील धनंजय सखाराम सावंत यांचा सत्कार खास. सुनिल तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला आयोजित सत्कार कार्यक्रमात रायगड जिल्हा परिषदेचे कृषी आणि दुग्धव्यावसाय सभापती बबन मनवे, प्रदेश चिटणीस अलिशेठ कौचाली, म्हसळा पंचायत समितीच्या सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदिप चाचले, तहसीलदार शरद गोसावी, नायब तहसीलदार के. टी. भिंगारे, पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, माजी सभापती तथा पंचायत समिती सदस्या उज्वला सावंत, संतोष (नाना) सावंत, मंडळ अधिकारी सलीम शहा आदि मान्यवर उपस्थित होते. खास. सुनिल तटकरे यांच्या हस्ते हस्ते दोन्ही प्रगत शेतकऱ्याचा सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना खास. सुनिल तटकरे यांनी प्रेस क्लब च्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून प्रगतशील शेतकऱ्यांच्या माझ्या हस्ते सत्कार होणे हे मी माझे भाग्य असल्याचे समजतो असे गौरवोदगार काढले. तालुक्याचे भाग्यामुळे जिल्हा परिषदेचे कृषी आणि दुग्धव्यवसाय खात्याचे सभापती पद म्हसळ्याकडे आहे. कृषी सभापती बबन मनवे यांनी येत्या १५ दिवसात जिल्यातील सर्व कृषी विषयक अधिकाऱ्यांची सभा घेऊन शेतकऱ्यांच्या सर्व योजनाची माहिती घेऊन शेतकऱ्यांना यांचा जास्तीत जास्त कसा फायदा होईल याबाबत उपाय योजना करण्याची सूचना केली. काही कोटींची उलाढाल करून बागायत करणारा पाभरे येथील एक तरुण शेतकरी माझ्या जिल्ह्यात असल्याचे समाधान मला असल्याचे त्यांनी याप्रसंगी मनोगतातून व्यक्त करून शेती आणि पूरक व्यवसायाला चालना मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तालुका प्रेस क्लबच्या हा उपक्रम खुपच स्तुत्य आसुन शेतकरी वर्गाला नवीन दिशा, प्रेरणा देणारा आहे. तालुक्यातील पत्रकार शासनाचे धोरण समाजापुढे नेण्याचे अभ्यासू व सकारात्मक काम करीत असल्याचे सांगून शासनाचे विविध विषय आणि समाजाभिमुख निर्णय तळागाळापर्यंत पोचविण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. याप्रसंगी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष शशिकांत (बाबू) शिर्के, संजय खांबेटे, अशोक काते, श्रीकांत बिरवाडकर, वैभव कळस, महेश पवार, गणेश म्हाप्रळकर आदि पत्रकारांनी कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय खांबेटे यांनी तर सूत्रसंचालन अशोक काते यांनी केले.

मोटारसायकलीसह मोबाईल चोरी करणारा विधी संघर्ष बालक ताब्यात

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेलसह नवी मुंबई, उलवे, नेरूळ आदी परिसरात मोटारसायकलीसह मोबाईल चोरी करणाऱ्या विधी संघर्ष बालकास गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाच्या पथकाने ताब्यात घेऊन त्याच्याकडून लाखोंचा ऐवज हस्तगत केला आहे.

मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई चे सपोनि राजेश गज्जल यांना मिळालेल्या बातमीवरून मध्यवर्ती कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांनी विधीसंघर्षात बालकाने केलेले एनआरआय सागरी पोलीस ठाणे हद्दीतील चोरीस गेलेली बजाज पल्सर एन.एस. २०० मोटार सायकल कि, रू . ५०,०००/- हस्तगत करण्यात आलेली आहे. शिवाजीनगर पोलीस ठाणे, हद्दीतील बजाज पल्सर २२० मोटार सायकल, कि. रू.५०,०००/- हस्तगत करण्यात आलेली आहे. नेरूळ , उलवे परीसरातून चोरलेले वेगवेगळ्या कंपनीचे १ लाख १७ हजार रुपये किंमतीचे ११ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आलेले आहेत असा एकुण २ लाख १७ हजार रुपये किंमतीचा मोबाईल हस्तगत केला आहे. तसेच आरोपी इसम नामे अक्षय रवि पाटील, वय २० वर्षे, रूम नं.१०६, सेकंड प्लोअर, पाम रेसीडन्सी, सेक्टर १६ (अ), नेरूळ , नवी मुंबई हा मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा यांनी उघडकीस आणलेल्या मोटार सायकल चोरीच्या खालील ८ गुन्ह्यांमध्ये पाहिजे आरोपी होता, त्यास अटक करण्यात आलेली आहे व त्याच्याकडून पनवेल शहर, खांदेश्वर पोलिस ठाणे हद्द, न्हावा शेवा पोलिस ठाणे, रबाळे पोलिस ठाणे, एनआरआय पोलिस ठाणे आदी ठिकाणचे गुन्हे उघडकीस आले आहेत. वरील कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर, सपोनि, राजेश गुजाळ, पो.ना. लक्ष्मण कोपरकर, पो.शि. राहुल वाघ व पो.शि. विजय खरटमोल यांनी केलेली आहे.

शिवसंपर्क अभियान अंतर्गत चाणजे, केगाव येथे सभा संपन्न

दै.रायगड नगरी । उरण

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या सुचनेनुसार, रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुका शिवसंपर्क अभियाना अंतर्गत चाणजे जिल्हा परिषदेच्या केगाव व चाणजे पंचायत गण विभागाच्या सभा म्हातवली व करंजा येथे संपन्न झाल्या. उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांना मार्गदर्शन करतांना तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी पक्षप्रमुख यांना अभिप्रेत असलेल्या शिवसंपर्क अभियानाची माहिती दिली.

शाखाप्रमुख व शिवसैनिकांनी आपल्या गावात आधारकार्ड, रेशन, रिक्षा चालकांचे रजिशट्रेशन, सरकारी योजनांची अमंलबजावणी याविषयी प्रभावीपणे कामे करावी असे सांगितले. भाजपाने विमानतळ नामांतरा वरून केलेल्या कट कारस्थानाचा शिवसैनिकांनी समाचार घेतला. अखेर पर्यंत शिवसैनिक म्हणून राहिलेले दि.बा.पाटील यांच्या नावाचा गैरवापर करून नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाबत भाजपाने चालवलेल्या राजकारणाचा शिवसेनेने यावेळी समाचार घेतला.

गाव तेथे शिवसेना शाखा व घर तेथे शिवसैनिक ही शिवसंपर्क अभियानात मोहीम राबवून संघटनेची बांधणी अधिक मजबूत करण्याचे शिवसेनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आवाहन केले. या वेळी उपतालुकाप्रमुख जयवंत पाटील, उरण शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, उपतालुका संघटक अमित भगत, युवासेना विधानसभा अधिकारी नितेश पाटील यांनीही मार्गदर्शन केले.

या वेळी केगाव विभागप्रमुख एस के पुरो, चाणजे विभागप्रमुख हरेश्वर म्हात्रे, उपविभागप्रमुख रवी पाटील, चाणजे सरपंच मंगेश थळी तसेच दोन्ही विभागांतील शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, आजी- माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, युवासेना, महिला आघाडी पदाधिकारी व शिवसैनिक, उपस्थित होते.

पडसरे येथे आ.रविंद्र पाटील यांच्या हस्ते खावटी अनुदान योजनेचा शुभारंभ

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक प्रादेशिक कार्यालय जव्हार व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेण जिल्हा रायगड यांच्या संयुक्त विद्यमानाने अनुसूचित जमातीच्या कुटुंबीयांना साहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजनेअंतर्गत अन्नधान्य वस्तूचे किट वाटप वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ पेण- सुधागड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविंद्र पाटील यांच्या हस्ते पडसरे अश्रम शाळा पडसरे येथे करण्यात आला. सुधागड तालुक्यात या वर्षी अंदाजे पाच हजार आदिवासी कुटुंबियांना प्रत्येकी दरवर्षी चार हजाराची शासकीय मदत मिळणार आहे यातील दोन हजार थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार आहेत. तर दोन हजार रुपयाच्या जीवनावश्यक वस्तू मिळणार आहेत. आगामी काळात आदिवासींना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात यावा लोकप्रतिनिधी म्हणून सर्वतोपरी यंत्रणा व मदत उभी करीत असे असून देखील आश्वासन देखील आमदार रवींद्र पाटील यांनी दिले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

शॉर्ट सर्किटने कळंबोलीतील शेकडो विद्युत उपकरणे जळून निकामी

विद्युत उपकरणे पूर्ण पणे निकांमी झाल्याने येथील रहिवाशां समोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे . यावेळी अनेक तास वीज पुरवठाही खंडित झाला होता .या वसाहतीमध्ये बहुतांशी माथाडी वर्ग वास्तव्यास असून अगदी कमी पगारामध्ये आपला उदरनिर्वाह करीत आहेत. त्यात तांत्रिक चुकीमुळे निर्माण झालेल्या अपघाताने विद्युत उपकरणे निकामी झाल्याने मोठ्या आर्थिक संकटाला त्यांना सामोरे जावे लागत आहे. अचानक पणे निर्माण झालेल्या या आर्थिक संकटाला येथील रहिवाशांना सामोरे जावे लागत असल्याने वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने रहिवाशांचे झालेले नुकसान शासनाने पंचनामा करून आर्थिक नुकसान भरून देण्याची मागणी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आत्माराम गावंड व शिवसेनेचे कळंबोली उपशहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर यांनी शासनाकडे केली आहे. याबाबतचा पत्रव्यवहार ते विद्युत वितरण कंपनी व तहसीलदार यांच्याकडे करणार आहेत.

राज्यपालांनी हेवेदावे विसरुन १२ सदस्यांची नेमणूक करावी : राज्य सरकार

राज्यपालांना नावं पाठविण्यात आल्यानंतर १५ दिवसांत निर्णय येणं आवश्यक होते. पण राज्यपालांनी तब्बल आठ महिने उलटूनही याबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे राज्यपाल या सदस्यांच्या नावाची फाईल अशाप्रकारे रोखू शकत नाहीत. त्यांना यावर निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे, मग तो सकात्मक असो वा नकारात्मक पण निर्णय अपेक्षित आहे. असा दावा राज्य सरकारच्यावतीने ज्येष्ठ वकिल रफिक दादा यांनी युक्तिवाद करताना केला. त्याची दखल घेत हायकोर्टानं यासंदर्भात केंद्र सरकारला प्रतिवादी करण्याचे तसेच केंद्राच्यावतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग यांना मंगळवारी भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

संघटनेच्या माध्यमातून कंत्राटी कामगारांसाठी ऐतिहासिक पगारवाढ

सल्लागार आसिफ मुल्ला, संघटनेचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील, कार्यालयीन सचिव समीरा चव्हाण, संघटक रविंद्र कोरडे, भाजप कामगार आघाडीचे उरण तालुकाध्यक्ष चंद्रकांत कडू, श्री. कृपा एंटरप्राइजेसचे वैभव पाटील, ओसीएस ग्रुप इंडिया प्रा लि. चे मिराज सय्यद, जेमिनी इक्विपमेंट प्रा लि. चे राहुल बालिया, मॅनपावर सप्लाय सिस्टीमचे अनिल दानी, केमस्पेक् केमिकल्स युनिट अध्यक्ष संतोष घरत, उपाध्यक्ष अंकुश घरत, कामगार प्रतिनिधी युनिट अध्यक्ष सचिन पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, चिटणीस सुरेश पाटील, सदस्य नारायण पाटील, प्रभाकर पाटील, प्रवीण पाटील, नितीन पाटील, प्रकाश सिंग, प्रकाश गडगे, सुमन दिपंकर आदी उपस्थित होते.

या कंपनीत पूर्वी कामगारनेते बाबू थॉमस यांची युनियन कार्यरत होती. मात्र त्यांच्या युनियनने कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबितच ठेवले. त्यामुळे या कामगारांनी जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे नेतृत्व स्विकारले. सुरुवातीलाच संघटनेचा झेंडा लावण्यापासून संघर्ष सुरु झाला. मात्र जितेंद्र घरत यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक अडथळे पार करत २०१९ पासून प्रलंबित असलेला करार यशस्वीपणे घडवून आणला.

चार वर्षांसाठी झालेल्या करारानुसार पहिल्या वर्षी ०४ हजार, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी प्रत्येकी ०३ हजार, तर चौथ्या वर्षी २५०० रुपये अशी एकूण १२ हजार ५०० रुपयांची पगारवाढ करण्याबरोबरच थकबाकी, ०३ लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी, बोनस व इतर सर्व सोयीसुविधा देण्याचे मान्य झाले. या करारामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

फुंडे, डोंगरी व पाणजे गावांसाठी आपत्कालीन स्थितीत पर्यायी रस्त्याची मागणी

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील डोंगरी फुंडे पाणजे या तीन गावांना जोडणारा पूल मागील ३ महिन्यांपूर्वी कोसळला होता. दुर्दैवाने उरण डाऊरनगर येथील दिपक चौथुराम कासुकर या तरुणाचा या पुलात कोसळून मृत्यू झाला होता.

डोंगरी, फुंडे, पाणजे या तिन्ही गावांना व जेएनपीटी बंदराकडे जाण्यासाठी सर्वात जवळचा मार्ग म्हणून नागरिकांची या पुलावरून ये - जा सुरु होती. मात्र पुलच कोसळल्याने या तिन्ही गावातील नागरिकांचा संपर्क तुटला असून दैनंदिन प्रवास करणेही त्रासदायक ठरत आहे. नागरिकांना वळसा घेऊन दुसऱ्या मार्गाने प्रवास करून आपले गाव गाठावे लागत आहे. त्यामुळे वेळ व पैसा दोन्ही जास्त प्रमाणात खर्च होत आहे. वेळ व इंधनाची बचत व्हावी, नागरिकांचा त्रास वाचावा यासाठी या ठिकाणी लवकरात लवकर नवीन पूल बांधावा व नवीन पूल तयार होईपर्यंत तिथेच बाजूला पर्यायी मार्गाची व्यवस्था करावी अशी मागणी डोंगरी ग्रामपंचायतीच्या वतीने सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक,मुख्य कार्यकारी अभियंता सिडको व कार्यकारी अभियंता सिडको कार्यालय उरण येथे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.यावेळी कामगार नेते महादेव घरत, डोंगरी ग्रामपंचायतचे सरपंच निलेश घरत,माजी उपसरपंच किरण घरत आदी उपस्थित होते.

नमुना एम डी
(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने
वृत्त पत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीशीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्रमांक MH/46/CC/AUTO/2017/143 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्रमांक MH46-AZ-0723 चे मालक निवृत्ती पुंडलिक म्हात्रे यांचे तारीख ०४/१०/२०२० रोजी निधन झालेले आहे. मी **अश्विनी निवृत्ती म्हात्रे** पत्ता मु.वलवली, ता.पनवेल, जि.रायगड उपरोल्लेखित वाहनाचा कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे. याबाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/ प्रादशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे.

उत्तराधिकाऱ्याचे नाव : अश्विनी निवृत्ती म्हात्रे
पत्ता : मु.वलवली, ता.पनवेल, जि.रायगड

सही/-
अश्विनी निवृत्ती म्हात्रे

ॲड.सुधीर एस. म्हात्रे
ॲड.कल्याणी एस. म्हात्रे

जाहीर नोटीस

पेण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९७/२०२१
ने.ता.२०/०८/२१

१) सौ.सुलोचना ज्ञानदेव म्हात्रे
वय : ५४ वर्षे, गृहिणी
२) कु.नमित नितेश म्हात्रे
वय : ५ वर्षे,
रा.घर नं.१०९३, मानसरोवर स्टेशन रोड,
सेक्टर नं.१०, कामोठे, आगरी समाज हॉल जवळ,
कामोठे, जि.रायगड ४१०२१८ अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.प्रियंका नितेश म्हात्रे
(लग्नापूर्वीची प्रियंका रमेश खानावकर)
वय : २६ वर्षे, गृहिणी
रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. नितेश ज्ञानदेव म्हात्रे हे दि.०३/०६/२०१६ रोजी कामोठे पनवेल येथे निधन झाले आहे. त्याअर्थी अर्जदार सौ.सुलोचना ज्ञानदेव म्हात्रे, कु.नमित नितेश म्हात्रे यांनी कै.नितेश ज्ञानदेव म्हात्रे यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत कै.नितेश ज्ञानदेव म्हात्रे यांचे सदर अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत वारस सर्टीफिकेट मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : वरवणे, ता.पेण, जि.रायगड

मौजे	स.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पैसे
वरवणे	२३५	०-५९-७	१.५०

वरील अर्जदार हे मयत यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल आणि ते जर कै.नितेश ज्ञानदेव म्हात्रे यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यांस वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१६/०७/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पेण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पेण

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

सर्पमित्रांनी दिले जाळ्यात अडकलेल्या साडे नऊ फुटी धामण सापाला जीवदान

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील दिघोडे येथील शेतकऱ्याच्या शेताच्या कुंपणाला लावलेल्या जाळ्यात अडकलेल्या साडे नऊ फूट धामण जातीच्या सापाला सर्पमित्रांनी शिताफीने काढून वनरक्षकांच्या समक्ष जंगलात सोडून जीवदान दिले आहे.

उरण तालुक्यातील दिघोडे येथील शेतकरी प्रेमनाथ म्हात्रे यांनी आपल्या शेतीच्या संरक्षणासाठी शेतीच्या सभोवताली लावलेल्या जाळ्यात साप अडकल्याची माहीती शेतकऱ्यांनी सर्प मित्रांना दिली.चिर्ले येथील वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आनंद मढवी आणि त्याचे सहकारी पंकज घरत, शुभम मढवी, दिलीप मढवी, विनीत मढवी व बंटी शेळके यांना घेऊन घटनास्थळी पोहचले असता त्यांना जाळ्यात बिनविषारी असलेला धामण जा-तीचा साप दिसला.त्यांनी अगदी हळुवारपणे चाकूने जाळे कापून त्या धामण जातीच्या सापाला शिताफीने जाळ्यातून बाहेर काढले.

या सापाची माहिती या भागातील वनरक्षक मेजर सूरदास धांडे आणि मेजर किरण देवकर यांना देऊन त्या सापाचा पंचनामा करण्यात आला त्यामध्ये धामण सापाची लांबी साडे नऊ फूट असल्याचे आढळून आहे. तसेच कोणतीही इजा झाली नसल्याने त्या धामण सापाला रानसई जंगलात सोडून त्याला जीवदान दिले.सापां बद्दल अनेक समाजामध्ये अनेक समज गैरसमज आजही दिसुन येत आहेत. परंतु सर्प मित्रांच्या समाजप्रबोधन मुळे आज शेतकऱ्यांचा मित्र असलेल्या सापाला जीवदान मिळत आहे. याचे जिवंत उदाहरण या वाचलेल्या धामण सापाचे आहे.

फसवले गेलेल्यांचं पुन्हा लवकरच लसीकरण करण्यात येणार

दै.रायगड नगरी । मुंबई

बनावट लसीकरण प्रकरणात २००० लोक पीडित आहेत. या लोकांच्या लसीकरणासाठी स्वतंत्र लसीकरण शिबिर आयोजित करण्यात येणार आहे, असे मुंबई महापालिकेने उच्च न्यायालयाला शुक्रवारी सांगितले.

खासगी लसीकरण मोहिमेअंतर्गत २०५३ लोकांना फसवण्यात आले. त्यापैकी १,६३६ लोक आमच्याकडे आले. आम्ही त्या सर्वांची वैद्यकीय चाचणी केली. त्यांच्या तब्येतीवर कोणतेही विपरीत परिणाम झालेले नाहीत. लसऐवजी त्यांना सलाइनचे पाणी देण्यात आले, असे पोलीस अहवालात म्हटले आहे, अशी माहिती मुंबई महापालिकेतर्फे ज्येष्ठ वकील अनिल साखरे यांनी मुख्य न्या. दीपांकर दत्ता व न्या. गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाला दिली.

आम्ही केंद्र सरकारला पीडितांचे रजिस्ट्रेशन पोर्टलवरून हटवण्याची विनंती करून त्यांना पुन्हा नोंदणी करण्याची मुभा द्यावी, अशी विनंती केली आहे, असे साखरे यांनी न्यायालयाला सांगितले. संबंधित आरोपींवर दोन आठवड्यांत आरोपपत्र दाखल करू, अशी माहिती मुख्य सरकारी वकील अरुणा पै-कामत यांनी न्यायालयाला दिली. सर्वांना लस सहज मिळावी आणि लस मिळवण्यासाठी नागरिकांना को-विन पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी जो त्रास सहन करावा लागतो, तो कमी करण्यासाठी को-विन पोर्टलमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश सरकारला द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिका व्यवसायाने वकील असलेले सिद्धार्थ चंद्रशेखर यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

नेरळकर समस्यांच्या विळख्यात ; वीज जोडणी कापली, अनेक भागात पाण्याची टंचाई

दै.रायगड नगरी । कर्जत

नेरळ नळपाणी योजनेचे लाखो रुपयांचे वीज बिल थकीत असल्याने महावितरण कंपनीने १५ जुलै रोजी नळपाणी योजनेची वीज जोडणी कापली आहे. त्यामुळे आज नेरळ गावातील अनेक भागात पाणी पोहचले नाही आणि ऐन पावसाळ्यात नेरळ गावात पाणीटंचाई दिसून आली. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायत मध्ये नवीन सरपंच पदावर बसत असतानाच वीज जोडणी कापण्यात येत असल्याने नवीन सरपंच उषा पारधी यांच्यासाठी येणारा काळ खडतर आहे?असे दिसून येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ने १९९८ मध्ये राबवलेली नळपाणी योजना उल्हास नदीवरून पाणी उचलून नेरळ गावात आणण्यात येते.बोर्ले येथे असलेल्या उद्धभव केंद्रातून पाणी उचलण्यासाठी वीज वापरली जाते आणि त्या वीज वापाराचे देयक गेली काही महिने थकीत आहे. मे २०२१ मध्ये हे देयक एक कोटींच्या पुढे गेले होते. मात्र आजारी असलेले तत्कालीन सरपंच यांनी थकीत वीज बिलांचा टप्पा निश्चि त करून ते थकीत बिलाची रक्कम ७५ लाखांवर खाली आणली होती. मात्र रावजी शिंगवा यांचे निधन झाल्यानंतर प्रभारी सरपंच शंकर घोडविंदे यांच्याकडे सहीचे अधिकार नसल्याने थकीत वीज बिलाची रक्कम मागील महिन्यात जमा झाली नाही.

परिणामी वीज बिलाची थकीत रक्कम वसूल करण्याचा दबाव महावितरण कंपनीच्या नेरळ दोन क्रमांकाच्या कार्यालयावर वाढत होता. उपअभियंता कार्यालयाकडून सतत होणारी वसुलीची मागणी लक्षात घेऊन नेरळ कार्यालयाने थकीत वीज बिल भरण्यासाठी नेरळ ग्रामपंचायतकडे तगादा लावला होता. त्यामुळे १२ जुलै रोजी नेरळ ग्रामपंचायतने १५ लाखाचा धनादेश थकीत वीज बिलापोटी महावितरण कंपनी कडे जमा केला होता. मात्र महावितरण कंपनीकडे वरिष्ठ कार्यालयाकडून असलेला दबाव यामुळे पुन्हा थकीत बिलाची मागणी नेरळ कार्यालयाने नेरळ ग्रामपंचायतकडे केली. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतला २५ जुलै पर्यंत मुदतवाढ द्यावी अशीलेखी मागणी केली होती.

ग्रामपंचायत कार्यालय सरपंच पदाच्या निवडणुकीचे व्यस्त असताना १५ जुलै रोजी महावितरण कंपनीने नेरळ ग्रामपंचायतला पाणीपुरवठा करणारे वीज मीटर ची जोडणी कापली.

बोर्ले येथील नदीमधून पाणी उचलण्याचे केंद्रातील वीज जोडणी तोडण्यात आल्याने नेरळ गावाला पाणीपुरवठा करणारी सर्व यंत्रणा ठप्प झाली. नेरळ ग्रामपंचायत प्रशासनाने थकीत वीज बिल भरण्यासाठी २५ जुलै ची मुदत मागितलेली असताना १५ जुलै रोजी वीज जोडणी तोडज्यात आल्याने नेरळ ग्रामपंचायत प्रशासन हैराण आहे. ग्रामपंचायत मध्ये नवीन सरपंच उषा पारधी यांची बिनविरोध निवड होत असताना महावितरण कंपनीने वीज जोडणी तोडण्याची केलेली कार्यवाही घाई घाईने केली असल्याचा आरोप केला जात आहे. सध्या ५३ लाखाचे थकीत बिल नेरळ ग्रामपंचायतकडे असून ते भरल्यानंतरच वीज जोडणी पुन्हा जोडली जाईल अशी भूमिका महावितरण कंपनीच्या वरिष्ठ कार्यालयाने घेतली आहे. त्यामुळे नेरळ गावातील अनेक भागात गेली काही दिवस कमी दाबाने वीज पुरवठा होत असून आता वीज जोडणी तोडण्यात आल्याने नेरळ ग्रामस्थ हैराण आहेत.

म्हसळा तालुक्यात लसीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.रायगड नगरी । म्हसळा

देशात आणि राज्यात लसीकरणाला प्रचंड प्रतिसाद मिळत असतानाच म्हसळा तालुक्यात सुध्दा लसीकरणाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. तालुक्यात लसीबाबत कोणताही गैरसमज नसल्याचे वैद्यकिय आधिकाऱ्यानी सांगितले. तालुक्यात ग्रामिण रुग्णालय म्हसळा, प्रा.आ.केंद्र खामगाव,प्रा.आ.केंद्र मेंदडी व प्रा.आ.केंद्र म्हसळा अशा चार केंद्रांवर लसीकरण केंद्र सुरु आहे.

प्रा.आ.केंद्र मेंदडी अंर्तगत खरसई, वारळ, रेवली, वरवठणे, तोंडसुरे, गोंडघर, काळसुरी, तुरांबाडी, प्रा.आ. केंद्र खामगाव अंर्तगत आंबेत, मांदाटणे, चिखलप आदीवासी वाडी, संदेरी, देवघर कोंड, वावे, तोराडी, आमशेत या गावांतून प्रत्यक्ष भेटी देऊन लसीकरण करण्यात आले. यासाठी स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

यासाठी प्रा.आ.केंद्र खामगाव येथील डॉ. गीतांजली हंबीर, डॉ.प्राजक्ता पोटे प्रा.आ.केंद्र मेंदडी येथील डॉ. विशाल भावसार, डॉ.पूजा डोंगरे,व प्रा.आ.केंद्र म्हसळा येथील डॉ. प्रियांका देशमुख, डॉ.नेहा पाटील, आरोग्य सेवक मंगेश चव्हाण, अरुण कोल्हे, सागर सायगावकर आरोग्य सेविका शितल भगत, दिपिका दिवेकर, ज्योती महाडीक, आरोग्य सहायक शैलेश लाखे, गणेश दाताळ स्थानिक आशा, अंगणवाडी सेविका, मदतनीस, प्रा.शाळांचे शिक्षक, पोलीस पाटील यानी चांगली मदत केली. तालुक्यात आजपर्यंत सुमारे ४०% लसी करण झाले असावे. पहिला डोस घेणाऱ्यांची संख्या १११०९, दुसरा डोस ९६८ लाभीर्थानी घेतला आहे.

शेतकरी कामगार पक्षातर्फे आदाड गणपती मंदिरास इन्व्हर्टर भेट

दै.रायगड नगरी । मुरुड

नुकत्याच होऊन गेलेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण मुरुड तालुक्यासह आदाड गावाचेही फार नुकसान झाले आहे. पुरामुळे मंदिरेही सुटली नाहीत.

आदाड मधील गणपती मंदिरात सुमारे सहा फूट पाणी होते त्यामुळे मंदिरातील इन्व्हर्टर खराब झाला आहे.

जागोजाग विजेचे पोल पडले आहेत काही ठिकाणी वाकले आहेत त्यामुळे विजेचा लपंडाव सुरूच असून मंदिरातील वीज वारंवार जात असते तसेच आपत्कालीन गावातील काही लोक मंदीराचा आधार घेतात.

त्यामुळे मंदिर अंधारात राहू नये यासाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे नेत्या चित्रलेखा पाटील यांनी मुरुड तालुक्यातीलआदाड येथील गणपती मंदिरासाठी इन्व्हर्टर सेट भेट दिला त्याप्रसंगी उसरोली ग्रामपंचायत सरपंच मनीष नांदगावकर, उपसरपंच महेश पाटील व आदाड ग्रामस्थ उपस्थित होते.

पांढरवेढा एका जंगलातील रहस्यमयी गोष्ट ; श्रीवर्धनमधील तरुणांनी साकारला एक लघु चित्रपट

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

निसर्गाचं वरदान लाभलेल्या घनदाट जंगलात दडलेली नैसगिर्क संपत्ती लाटण्यासाठी मानव कोणत्याही थराला जातो. त्यासाठी दुर्मिळ जनावर दुर्मिळ वनस्पती आदींची कत्तल केली जाते. इतकाच नाही तर लालसेपोटी यासाठी मानव मानवाचा देखील बळी घेण्यास कमी करत नाही.

त्याचप्रमाणे एका घनदाट जंगलातील विहिरीतून सोन्याची नाणी काढण्यासाठी गावातील नागरिकांना जंगलात अडकवणाऱ्या एका व्यक्तीचा काल्पनिक लघुचित्रपट श्रीवर्धन मधील तरुणांनी साकारला आहे. पांढरवेडा हे एक घनदाट जंगलाच्या कुशीत वसलेलं गाव आहे. घनदाट जंगलातील रहस्यमयी अशी काल्पनिक गोष्टीवर आधारित एक लघुकथा आहे. या कथेत नंदन नावाच्या मुलाची प्रमुख भूमिका कथेचे लेखक दर्पण जाधव याने केली आहे. दिग्दर्शन अजिंक्य भोसले, छायाचित्रकार अभिषेक पोतनीस धनंजय म्हात्रे, पद्मनाभ खोपकर, धनंजय म्हात्रे यांनी केलं आहे. तर राजन काका यांच्या भूमिकेत - विशाल नागवेकर ,यश - गौरव करंजकर, हरि काकाच्या भूमिकेत किशोर शिताले ही श्रीवर्धनमधील तरुण कलाकार पहावयास मिळत आहेत.

या कथेत नंदन नावाचा एक मुलगा पंधरा वर्षांनी आपल्या पांढरवेढा गावात येतो. गावात आल्यावर त्याला गावात घडणारे चित्र विचित्र प्रकार निदर्शनास येतात. गावातून अचानक माणसं गायब होतात. गायब झालेल्या माणसांना पांढरवेढा जंगल गिळतो. जंगला पासून रक्षण होण्यासाठी गावातील नागरिक जंगलाला प्राण्याचा बळी देतात. गावातील नागरिकांना अंधश्रद्धा आणि गैरसमज झालेला असतो. हे सर्व प्रकार बघून नंदन अस्वस्त होऊन गावातील माणसं गायब होण्यामागचे खरं कारण शोधण्याचा प्रयत्न करतो. भीतीने जंगलाकडे घाबरून कोणीही फिरकत नसताना नंदन सर्व प्रकाराची शहानिशा करण्यासाठी पांढरवेढ्याच्या जंगलात जातो.

जंगलात त्याला काही रहस्यमयी गोष्टी दिसतात. जंगलात एक सोन्याचे शिक्के मिळणारी विहीर असते. मात्र विहिरीतून मूठभर शिक्के काढणासाठी एक राखणदार म्हणून माणूस आणला तरच विहिरीतून मूठभर सोन्याची नाणी काढता येतात. त्यासाठी गावातील एक प्रतिष्ठित व्यक्ती गावातील एक एक व्यक्तीला या विहिरीचा राखणदार म्हणून अडकवत असून आपलं ध्येय साध्य करून घेत असत. जंगतील या भागास दुसरी बाजू दुसरी बाजू म्हणून ओळखली जाते. आश्या काल्पनिक रहस्यमयी घटनांचा उलगडा या लघुचित्रपटात मांडला आहे. सध्या हा लघुचित्रपट आम्ही आहोत स्टगलर या युट्युब चॅनल वर दिसत असून लघुचित्रपटाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

दोन लाख २५ हजार रुपयांच्या दागिन्यांची चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

चोरट्यांनी घरात प्रवेश करून दोन लाख २५ हजार रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याचा प्रकार आहे शिरढोण गाव येथील ग्रीन सोसायटी येथे घडला आहे. चोरा विरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलीप मधुकर किनरे हे शिरढोण येथे राहत असून त्यांनी दागिने लाकडी कपाटामध्ये ठेवले होते. १३ जुलै रोजी त्यांची पत्नी दूर्वा हिचा वाढदिवस असल्याने तिने दागिने बघितले. यावेळी सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याची चैन ठेवलेल्या लाकडी कपाटात दागिने मिळून आले नाहीत. त्यामुळे अज्ञात इसमाने घरात प्रवेश करून दोन लाख २५ हजार रुपयांचे दागिने चोरी केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी शहर पोलिस ठाण्यात जाऊन अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा योगीता पारधी यांच्या सहकार्यामुळे कोव्हिड-१९व्हॅक्सिन उपलब्ध

दै.रायगड नगरी । पनवेल

रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा योगीता पारधी यांच्या सहकार्यामुळे तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पारगाव याठिकाणी कोव्हिड-१९ची व्हॅक्सिन उपलब्ध झाली व त्याचा फायदा ग्रामस्थांना झाला आहे.

रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा योगीता पारधी यांनी ग्रुप ग्रामपंचायत पारगाव, ता- पन-वेल, या पंचायतला एकूण ८६ लोकांची कोव्हिड-१९ची व्हॅक्सिन दोन टप्प्यात उपलब्ध करून दिली. ही व्हॅक्सिन घेण्यासाठी ओवळे गावचे उद्योगपती तसेच सामाजिक कार्यकर्ते रायगड जिल्हा उपाध्यक्ष (काँग्रेस) नंदराज शेठ मुंगाजी व ग्रुप ग्रामपंचायत पारगाव चे माजी उपसरपंच मनोज दळवी तसेच ग्राम पंचायत हद्दीतील नागरिक उपलब्ध होते. यासाठी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांनी सातत्याने जिल्हा परिषदेकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला.

यासाठी पंचायत समिती पनवेल चे आरोग्य अधिकारी डॉ.नखाते, गव्हाण विभागीय आरोग्य अधिकारी डॉ.आस्मिता पाटील, डॉ.जोशी, डॉ.चौधरी व डॉ. पाटील, आशा वर्कर यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच यावेळी मार्गदर्शक म्हणून सरपंच सौ.अहिल्या बाळाराम नाईक, उपसरपंच सौ. अंजली राहुल कांबळे, माजी उपसरपंच मनोज राम दळवी, माजी उपसपंच सुशीलकांत बाळकृष्ण तारेकर, सदस्या सौ.निशा रत्नदीप पाटील, सदस्य, सदस्या ग्रामविकास अधिकारी मोकल, कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते बाळाराम शेठ नाईक, रत्नदीप पाटील, तंटा मुक्ती अध्यक्ष सदाशिव पाटील हे उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषद व आरोग्य विभागाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीसाठी उपलब्ध करून दिलेल्या व्हॅक्सिनबद्दल त्यांचे ग्रामपंचायतीच्या वतीने आभार मानत आहे.

- सरपंच सौ.अहिल्या नाईक

रानभाज्यांना उठाव नाही, पालीत आदिवासी भाजीविक्रेते ग्राहकांच्या प्रतीक्षेत

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

कोरोना महामारीने मोठे संकट उभे केले. रोजगारावर मोठी कुऱ्हाड कोसळली. पावसाळ्यात रानावनात उगवणार्या रानभाज्या विकून जिल्ह्यातील असंख्य आदिवासींच्या घरातील चुली पेटतात. मात्र कोरोनाचे सावट व लोकडाऊन यामुळे या रानभाज्यांना उठावच नाही आहे. त्यामुळे धंदा निम्म्याने कमी झाला आहे असे पालीत बहुसंख्य आदिवासींनी सांगितले. परिणामी आदिवासींचा रोजगार हिरावला गेला आहे.

दोन वर्षांपूर्वी रानभाज्या विकून दिवसाला ३०० ते ४०० रुपये मिळायचे. मात्र आता जेमतेम १५० ते २०० रुपयांवर समाधान मानावे लागत आहे. असे ताई वाघमारे या महिलेने सांगितले. सलग दुसऱ्या वर्षी कोरोना आणि लॉकडाऊन असल्याने रानभाज्यांना गिऱ्हाईक नाही. विशेष म्हणजे दर देखील स्थिर असतांना रानभाज्या पडून राहत आहेत. पावसात दिवसभर बसून देखील विक्री होत नसून थोडेफार पैसे घेऊन घरी परतावे लागत आहे. असे पार्वती वाघमारे या रानभाजी विक्रेत्या महिलेने सांगितले.

या रानभाज्या प्रामुख्याने आदिवासी महिला बाजारात विकण्यास आणतात. ओल्या काजूगरांचा हंगाम सरल्यावर पावसाळ्यात या रानभाज्या आदिवासींना हक्काचे दोन पैसे मिळवून देतात.

जिल्ह्यात या हंगामात शेवळं, टाकळा, कुई, शेंडवळ, अळू, खरसुंडीच्या शेंगा, भारंगी, कर्टुले, फोडशी, काकडं, भोंड्याची भाजी अशा विविध रानभाज्या मिळतात. या रानभाज्या आरोग्यासाठी उपयुक्त असतात. कारण त्यात मोठ्या प्रमाणात जीवनसत्व व खनिजद्रव्य असतात. सोबतच पावसाळी मोसमात आपल्या शरीराला आवश्यक औषधी गुणधर्म त्यात सामावलेली असतात.

कोरोना व लॉकडाऊनमुळे रानभाज्या विकल्या जात नसल्याने जिल्ह्यातील आदिवासींचे लाखो रुपयांचे उत्पन्न घटले आहे. रानभाज्या विक्रीसाठी जिल्ह्यात स्थानिक पातळीवर हक्काची बाजारपेठ मिळाली पाहिजे.

रानभाज्यांचे दर निश्चित करायला हवेत. रानभाजी महोत्सवासारखे उपक्रम राबवून रानभाज्यांचा प्रचार प्रसार झाला पाहिजे.

रमेश पवार; कोकण संघटक, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, शाखा रायगड

संक्षिप्त...

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियानांतर्गत अधिकारी यांची पुगांव ग्राम संघाला सदिच्छा भेट

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आज दि.१६/०७/२०२१ रोजी रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील पुगाव ग्रामपंचायतीमधील सावित्रीबाई ग्राम संघला मुख्य परिचालन अधिकारी उमेद माननीय श्रीमती मानसी बोरकर मॅडम यांनी सदिच्छा भेट दिली व सावित्रीबाई महिला ग्राम संघ पुगावमार्फत तयार करण्यात आलेल्या परसबागेची ही पाहणी केली.

यावेळी महिलांनी बनवलेल्या वस्तू पाहताना व त्यांना मार्गदर्शन करताना, त्याच प्रमाणे राज्य मिशन व्यवस्थापक, क्षमता बांधणी व प्रशिक्षण माननीय श्रीमती वैशाली ठाकूर मॅडम यांनी महिलांना ग्रामसंघ लेखे व उपसमिती यांची ओळख करून महिलांशी संवाद साधला. यावेळी तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष ,रोहा व जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष रायगड ची टीम व सावित्री फुले महिला ग्रामसंघातील महिला कमिटी व सर्व सदस्या ही उपस्थित होत्या.

नागोठण्याजवळील आंबेराई (चोळे) येथील तरुणी बेपत्ता

दै.रायगड नगरी । वाकण

नागोठण्याजवळील व नागोठणे पोलीस ठाणे हद्दितील आंबेराई (चोळे), पो. बेणसे, ता. पेण येथील २० वर्षीय तरुणी कु. नमिता दिलिप म्हात्रे ही तरुणी शनिवार दि. १७ जुलै रोजी पहाटे ३ वाजल्यापासून बेपत्ता झाली आहे. त्यामुळे तिच्या हरविल्याची तक्रार तिचे वडिल दिलिप रामदास म्हात्रे (वय ४३) यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

कु. नमिता दिलिप म्हात्रे ही तरुणी पहाटेच्या वेळी घरात कुणालाही काही एक न सांगता निघून गेली. त्यानंतर तिच्या घरच्यांनी तिचा शोध घेतला असता ती अद्याप कुठेच न सापडली नाही. तिच्या वडिलांनी नागोठणे पोलिस ठाण्यात केलेल्या तक्रारीनुसार या तरूणीचे वर्णन उंची १६२ सें.मी. सडपातळ बांधा, रंग गोरा, उभट चेहरा, अंगात काळी जिन्स, गुलाबी टी शर्ट, नाकात नकली चमकी, कानात नकली हि-यांची जुडी व पायात काळ्या रंगाचे बुट असा या मुलीचा पेहराव आहे. त्यामुळे याबाबत नागोठणे पोलिस ठाण्यात मुलगी हरविल्याची तक्रार नोंदविल्यात आली आहे.

१२ कोटींची पाली गावाची शुद्ध नळपाणी पुरवठा योजना वर्षांनुवर्षे लालफितीत

पालीकरांना प्यावे लागतेय दूषित पाणी, जनतेचे आरोग्य धोक्यात ; पालकमंत्री आदितीताई तटकरेंनी लक्ष घालण्याची मागणी

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सुधागड ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न निकाली निघाला आहे, मात्र सुमारे १२ कोटींची पाली गावाची शुद्ध नळपाणी पूरवठा योजना वर्षांनुवर्षे लालफितीत अडकून पडल्याने पालिकर जनतेत नाराजीचा सूर उमटत आहे. सुधागड पाली तालुक्यासाठी लोकसंख्येच्या तुलनेत सर्वसोई सुविधांनी परिपूर्ण व अद्यय्यावत असे ग्रामीण आरोग्य रुग्णालय असणे गरजेचे होते, अखेर या मागणीला यश आले. सुधागड तालुक्यातील पाली येथे ३० खाटांची रुग्ण क्षमता असलेल्या ग्रामीण रूग्णालयाची मुख्य इमारत व निवासी गाळे बांधण्याकरीता रू. २० कोटी २७ लक्ष ३३ हजार ३१५ इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रक व आराखड्यास शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मात्र याबरोबरच आणखी एक गंभीर प्रश्न कित्येक वर्षांपासून पालिकर जनतेला सतावतो आहे, तो म्हणजे शुद्ध व मुबलक पाणी पालीकरांना कधी मिळणार? पाली शहराला अंबा नदिचे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पुरविले जाते. तब्बल १५ हजाराहून अधिक लोक या पाण्यावर अवलंबून आहेत. पालीकरांना दूषित पाणी प्यावे लागत आहे, ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न जसा सोडविला तसाच पालकमंत्री ना. आदीतीताई तटकरेंनी लक्ष घालून सदर पाणी प्रश्न देखील सोडवावा अशी मागणी जनमानसातून जोर धरत आहे. अंबा नदीचे पाणी सांडपाणी, शेवाळ व केमिकलमुळे प्रदूषित झाले आहे. शोकांतिका म्हणजे पाली शुद्ध नळपाणी पुरवठा योजना मागील १५ ते २०

वर्षांपासून प्रलंबित आहे. सद्यस्थितीत तब्बल १२ कोटींची शुद्ध नळपाणी योजना लालफितीत अडकली आहे. ही रक्कम आणखी वाढण्याची शक्यता देखील आहे.

अंबा नदीच्या पाण्यात पावसाळ्यात गाळ व चिखलाचे प्रमाण अधिक असते. तर नंतर मोठ्या प्रमाणात हिरवळ व शेवाळ असते. साप, मासे, शिंपले नळाद्वारे थेट येतात. तसेच नाले व गटारांमधील प्रदुषित सांडपाणी, रासायनिक कंपन्यांमधील टाकऊ रसायन हे आंबा नदीत सोडले जाते. या बरोबरच कचरा आणि घाण देखिल साठते. नदिवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदित निर्माल्य देखील टाकले जाते. यामुळे अंबा नदीचे पाणी प्रचंड प्रमाणात प्रदूषित व खराब होते. या सर्वांमुळे पाण्याला उग्र स्वरुपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. असे पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी बहुसंख्य नागरिक अधिकचे पैसे खर्च करुन पिण्याच्या पाण्यासाठी बाटलीबंद पाण्याचा आधार घेत आहेत.

अंबा नदिजवळील जॅकवेलमध्ये असलेल्या पंपांद्वारे पाणी सरगडाच्या पायथ्याशी असलेल्या चार साठवण टाक्यांमध्ये सोडले जाते व तेथून सर्व पालीत पाणी पुरवठा केला जातो. तर काही भागात नदीतून थेट पाणी पुरवठा केला जातो. मात्र जॅकवेल ते साठवण टक्या यांच्या दरम्यानचे मोठे अंतर, वाहिन्यांचा छोटा आकार, वारंवार फुटणाऱ्या लहान, जुन्या व जिर्ण झालेल्या जलवाहिन्या, साठवण टाक्यांची दुरवस्था, सतत बिघडणारे व अपुर्या क्षमतेचे पंप, जॅकवेलमध्ये गाळ साठणे, जुने वॉल फुटणे, मुख्य जल वाहिनीला जोडलेल्या इतर वाहिन्या, वारंवार खंडित होणारा विज पुरवठा व अपुरे कर्मचारी अशा असंख्य कारणांमुळे पालीत नेहमी पाणी टंचाई भेडसावते. नळपाणी योजना झाल्यास ही समस्या निकाली निघू शकते. आमदार रविशेठ पाटील हे देखील पालीतील पाणी प्रश्नावर संबंधित अधिकारी वर्गाची बैठक घेऊन पालिकर जनतेला शुद्ध पाणी जलद गतीने कसे मिळेल यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत. दरम्यान ही योजना जुनी आहे. नगर पंचायत प्रशासक म्हणून ही योजना अंमलात आणण्यासाठी स्थानिक आमदार व लोकप्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा सुरू आहे. याकामी आम्ही सर्वोतोपरी सहकार्य करू असे दिलीप रायण्णावार, प्रशासक, नगरपंचायत पाली यांनी सांगितले.

शुद्ध पाणी योजनेची प्रतिक्षा

शासनाने केलेल्या २००८ - ०९ च्या सर्व्हेनुसार पालीची लोकसंख्या व पालीत दररोज येणार्या भाविक व पर्यटकांच्या संख्येनुसार शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेचे नियोजन केले होते. एकूण ७ कोटी ७९ लाखाचा निधी व १० टक्के लोकवर्गणी द्वारा नळयोजना उभी राहणार होती. परंतू राजकीय श्रेयवादामध्ये हि योजना रखडली गेली. त्याबरोबर १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्न देखिल होता. मात्र पालीला ''ब'' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाला आहे. तसेच शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेसाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. लोकवर्गणीची अट शिथील करण्यात आली आहे. पण अजुनही हि योजना कार्यान्वित होऊ शकलेली नाही. सर्वच राजकिय पक्ष व त्यांचे पुढारी या योजनेचे निवडणूकी पुरते भांडवल करतांना दिसतात.

उरण तालुक्यातील रानसई धरणाच्या पाण्याची पातळी वाढली

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्याच्या पूर्व दिशेला डोंगर कुशीत वसलेल्या उरण परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई धरण क्षेत्रात गेल्या पाच दिवसा-पासून समाधानकारक पाऊस झाल्याने धरणाच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे काही प्रमाणात उरण वासीयांचे पुरते पाणी संकट दूर झाले आहे.

उरण तालुक्यातील उरण शहर आणि औद्योगिक क्षेत्रांना रानसई धरणातून पाणी पुरवठा केला जातो. मे अखेर आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात धरणाची पाण्याची पातळी अतिशय कमी होते. त्यामळे उरण वासियांवर पाणी कपातीचे संकट निर्माण होत असते. या वर्षी निसर्गातील बदलामुळे पावसाने उशिरा हजेरी लावली मात्र मागील पाच दिवसापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणाच्या पाण्याची पातळी वाढली आहे.

काल १७ जुलै २०२१ रोजी पर्यंत धरण क्षेत्रात समाधान कारक पाऊस पडत आहे. त्यामुळे धरणाची पाण्याची पातळी ११० फुटापर्यंत वाढली आहे.तर ७.५८४ मिलियन कुबिक मीटर पाणी साठ्याची नोंद झाली असल्याची माहिती एमआयडीसीचे उपअभियंता रंजित बिरंजे यांनी दिली आहे. असाच धरण क्षेत्रात पाण्याचा जोर कायम राहिला तर लवकरच धरणाची शेवटची पाण्याची पा-तळी गाठून धरण ओसांडून पाहायला प्रारंभ होईल असेही बिरंजे यांनी स्पष्ट केले.

मांजराला ठार मारणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

दोन वर्षाचा मांजरास ठार मारणाऱ्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेक्टर १५, खारघर येथे राहणारे इस्माईल उस्मान शेख यांना मांजर पाळण्याचा छंद आहे. त्यांच्या घरी दोन मांजरे व त्यांची पाच पिल्ले तसेच एक नर मांजर आहे. १३ जुलै रोजी ते त्यांच्या मांजरांना फूड देण्याकरता गेले असता सेमी पार्शियन नर मांजर हे घरात दिसले नाही. म्हणून त्याला पाहण्यासाठी ते गॅलरीमध्ये आले असता त्यांना पार्शियन नर मांजर हे बिल्डिंगच्या खाली मोकळ्या रस्त्यावर पडलेले दिसले. या मांजराला कोणीतरी अज्ञात इसमाने जीवे ठार मारले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

शिवसेनेच्या शिव संपर्क २०२१ अभियानाला ग्रामीण भागातून सुरवात

दै.रायगड नगरी । पनवेल

शिवसेना पक्षप्रमुख तथा मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या आदेशा नुसार जिल्हाप्रमुख शिरीष घरत व जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल ग्रामीण भागातील मौजे नितलस, खैरणे, वावंजे, कुत्तरपाडा, चिंध्रण, चिंचवली, शिरवली, आंबे, मौजे महालुंगी, मोर्बे, खानाव, वाकडी, केवाळे, हरिग्राम, या ग्रामीण भागातील शिवसैनिक, पदाधिकारी व जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिव संपर्क अभियान दौरा आयोजित करण्यात आला होता.

शिव संपर्क अभियान दौऱ्यात उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील यांच्या समवेत भरत पाटील, शिवसेना संघटक पनवेल तालुका, दिपक निकम, शिवसेना विधानसभा संघटक, एकनाथ म्हात्रे, शिवसेना ग्रामीण तालुका प्रमुख, योगेश तांडेल, कुंभारकर, शशीकांत भगत, दत्ता फडके, शिवसेना संघटक, विभाग प्रमुख, शाखाप्रमुख, शिवसैनिक, तसेच युवा सैनिक शिव संपर्क अभियानात सहभागी झाले होते.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण भागातील समस्या जाणून घेतल्या तसेच काही ठिकाणी तात्काळ उपाययोजना केल्या.

गावठी दारू बनविणाऱ्याला अटक

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

उरण तालुक्यातील करंजा येथे शुक्रवार दि१६ रोजी ओम साई वर्कशॉप च्या मागील बाजूस पूर्वेस ओढ्याच्या लगत जंगलामध्ये एक इसम अवैधरित्या हातभट्टी वर गावठी दारु तयार करुन विक्री करत असल्याबाबत माहीती मिळाली होती. या माहीतीची शहानिशा करण्यासाठी गुन्हे शाखा कक्ष-२ चे सहाय्यक पोलिस निरिक्षक गणेश कराड आणि त्यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकुन आरोपी अनिल म्हात्रे यास हातभट्टी वरती दारू गाळत असतांना रंगेहात पकडले. त्याच्याकडून हातभट्टी चे साहित्य व ४० लिटरच्या ४ ड्रम असे एकूण १६० लिटर, व १५ लिटरच्या ५ पांढऱ्या रंगाचे प्लास्टिकचे कॅन त्यामध्ये एकूण ६० लिटर असे एकूण २२० लिटर गावठी दारु तयार करण्यासाठी लागणारे गुळमिश्रीत आंबवलेले मिश्रण जप्त करण्यात आले. आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये उरण पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करीत आहोत. पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष-०२ करीत आहोत.

आठ दिवसांनंतर श्रीवर्धनमध्ये आज सूर्यदर्शन; पावसाची उघडीप, नागरिकांना दिलासा

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

गेल्या आठवडाभरात श्रीवर्धन तालुक्यासह संपूर्ण परिसराला मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढले. सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे श्रीवर्धन तालुक्यातील नदी, नाले दुथडी भरून वाहताना दिसत होते. श्रीवर्धन बोर्लीपंचतन मार्गावरती खुजारे गावाजवळ नदीचे पाणी रस्त्यावर आल्यामुळे अनेक वेळा हा मार्ग बंद होण्याचे प्रकार देखील घडले होते.

तर श्रीवर्धन शेखाडी मार्गे बोरली या रस्त्यावरती वाळवटी ते आरावी दरम्यान नदीचे पाणी रस्त्यावर आल्यामुळे अनेक वेळा हा मार्ग देखील वाहतुकीसाठी बंद करावा लागला होता.

मागील शुक्रवारपासून श्रीवर्धन तालुक्यात मुसळधार पावसाने धूम धडाका लावला होता. तब्बल पंधरा दिवस विश्रांती घेतल्यानंतर पावसाने मागच्या शुक्रवारी श्रीवर्धन तालुक्यात व परिसरात जोरदार आगमन केले होते. पावसाने दडी मारल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची लावणीची कामे, त्याचप्रमाणे शेतीची कामे रखडली होती. परंतु पाऊस सुरू झाल्यानंतर शेतामध्ये चिखल होण्या योग्य पाणी साठल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी आपली लावणीची कामे जोरदार पणे सुरू केली आहेत.

सतत पडत असलेल्या पावसामुळे पाण्याची पातळी देखील मोठ्या प्रमाणावर वाढली असून श्रीवर्धन शहरातील सर्वच विहिरी जमिनीच्या पातळीवरती पाण्याने भरलेल्या आहेत. विहिरी तुडुंब भरल्यामुळे बचे कंपनीही पोहण्याचा आनंद खूप मोठ्या प्रमाणावर घेताना दिसत आहेत.

मागील आठवड्यापासून पर्यटन व्यवसाय सुरू होण्याच्या आशा पर्यटन व्यावसायिकांना दिसत होत्या. परंतु सतत पडत असलेल्या पावसामुळे पर्यटकांनी देखील श्रीवर्धन तालुक्यात येण्याकडे पाठ फिरविल्याचे पाहायला मिळत आहे. तब्बल आठ दिवसानंतर आज दुपारी श्रीवर्धन तालुक्यात सूर्यदर्शन झाले व काही प्रमाणात ऊन पडलेले पाहायला मिळाले. मात्र पाऊस चांगला प्रमाणात पडल्याने बळीराजा सुखावलेला पाहायला मिळत आहे.

कोविड-१९ लसीकरण मोहीम व आरटीपीसीआर कोविड-१९ चाचण्यांबाबत

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन आढावा बैठक संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

जिल्ह्यातील एमआयडीसी व इतर भागातील औद्योगिक आस्थापनांची कोविड-१९ लसीकरण मोहीम व आरटीपीसीआर कोविड-१९ चाचण्यांबाबत जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग रायगड चे सहसंचालक श्री. एम.आर. पाटील, कामगार आयुक्त पनवेल, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र रायगड, सर्व उपविभागीय अधिकारी, भूसंपादन अधिकारी, काळ प्रकल्प माणगाव तथा समन्वय अधिकारी, जिल्ह्यातील सर्व इंडस्ट्रियल असोसिएशनचे पदाधिकारी व ८० हून अधिक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी निधी चौधरी म्हणाल्या की, रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा उद्योग केंद्राकडे एकूण ३ हजार कंपन्यांचे ५४ हजार ७०० मनुष्यबळ व औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य विभागाकडे एकूण १ हजार ४२७ कंपन्यांच्या १ लाख ३० हजार मनुष्यबळासह एकूण ४ हजार ४२७ उद्योगांमध्ये १ लाख ८४ हजार ७०० मनुष्यबळासह या कंपन्या नोंदणीकृत आहेत.

जिल्ह्यातील औद्योगिक आस्थापनांकडील संघटित कर्मचारी/कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने देशाच्या तसेच राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासामध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. त्यामुळे संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये देशाचे व राज्याचे अर्थचक्र विनाअडथळा सुरू राहण्यासाठी कोविडबाबतच्या योग्य वर्तनाच्या पालनाची आवश्यकता असून त्यासाठी शासनाकडून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे.

तसेच औद्योगिक आस्थापनांमधील संघटित व असंघटित कर्मचारी/कामगारांचे आरोग्य सुस्थितीत राहण्यासाठी कोविड-१९ च्या आरटीपीसीआर चाचण्या दर पंधरा दिवसाला करण्याचे व लसीकरण शंभर टक्के पूर्ण करण्याचे निर्देश सर्व असोसिएशन व कपंनी व्यवस्थापनांना दिले. तसेच कंपन्यांकडील सामाजिक दायित्व निधी (उड्ठ) मधून गावे दत्तक घेऊन ग्रामीण भागातील नागरिकांना लस उपलब्ध करण्यासाठी पुढाकार घ्यावा. जिल्ह्यात जास्तीत जास्त लसीकरण झाल्यास संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये कोविड-१९ मुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी होणे शक्य होईल. औद्योगिक आस्थापनांमध्ये कामाच्या ठिकाणी व प्रवासादरम्यान कर्मचारी /कामगारांची संख्या मोठी असल्याने कोविड-१९ च्या सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात यावे. कोविड-१९ बाधित कामगारांचे उपचाराच्या नियोजनाबाबत जबाबदारीपूर्वक कार्य करावे, जेणेकरून कोविड-१९ च्या येणाऱ्या तिसऱ्या लाटेदरम्यान रायगड जिल्ह्यातील उद्योग-व्यवसाय सुरळीतपणे सुरू राहतील, अशा सूचनाही जिल्हाधिकारी चौधरी यांनी संबंधितांना दिल्या.

मुरुडमधील विहूर येथील रस्ता अतिवृष्टीमध्ये खचला असून रस्त्याच्या एका बाजूनेच वाहतूक सुरू आहे. (छाया : नितीन शेडगे, मुरुड)